# विनंती अर्ज समिती

सदस्यांनी सभागृहास सादर केलेल्या विनंती-अर्जातील तक्रारींबाबत छाननी करणे, वाटल्यास त्याबाबत साक्षीपुरावे घेणे व तत्संबंधी करावयाच्या कार्यवाहीबाबत शिफारस करणे हे या समितीचे काम आहे. या समितीत एकूण ५ सदस्य असतात व माननीय उप सभापती, विधानपरिषद या समितीचे पदसिध्द प्रमुख असतात. उप सभापतींचे पद रिक्त असेल तर, सभापती, असे रिक्त पद भरेपर्यंत कार्यकारी समिती प्रमुख म्हणून काम करण्यासाठी समितीच्या सदस्यांमधून एका सदस्यास नामनिर्देशित करतात. हे विनंती-अर्ज सभागृहात मांडलेल्या एखाद्या विधेयकांबद्दल किंवा सभागृहासमोर असलेले कामकाज अथवा सार्वजनिक महत्वाची बाब यासंबंधी असतात. (नियम २३८ व २३९)